सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी उद्योजकता

Victor I and Suresh Kanna K

पावसावर अवलंबून असणारे शेतकरी नेहमीच असुरक्षित असतात. मात्र संकटांना संधीमध्ये परावर्तित करण्यासाठी दृढ निर्धार आणि अनेकांचा आधार आवश्यक असतो. सेबॅस्टियन हे एक असेच उदाहरण आहे ज्यांनी, शेतकऱ्यांना सेंद्रिय पद्धतीची शेती करण्यासाठी मदत केली आणि स्वत: एक आदर्श म्हणून उभे राहिले.

हे सर्वज्ञात सत्य आहे की सेंद्रिय शेतीच्या संवर्धनात सेंद्रिय किंवा जैविक निविष्ठांच्या/कच्च्या मालाच्या वापराला महत्त्व प्राप्त झाले आहे. रासायनिक कच्च्या मालाचा वापर पारंपारिक शेतीमध्ये; मोठ्या प्रमाणावर पिकांचे खाद्य म्हणून तसेच संरक्षण करण्यासाठी म्हणून थेट कृतीकारक म्हणून ओळखला जातो, याउलट सेंद्रिय शेतीतील कच्च्या मालाचा वापर जमिनीला खाद्यान्न आणि किडींना आर्थिक मर्यादेच्या खाली ठेवण्यासाठीच्या वातावरण निर्मितीसाठी केल्या जातो. (ETL). या प्रयत्नात सेंद्रिय शेतीकडे जाण्याच्या मानसिकतेत असलेल्या शेतकऱ्यांसाठी दोन महत्त्वाचे मुद्दे आहेत. एक म्हणजे सेंद्रिय कच्च्या मालाची उपलब्धता आणि दुसरे म्हणजे उत्पादनाची गुणवत्ता. अलीकडच्या वर्षांत, काही नावीन्यपूर्ण उद्योजक शेतकऱ्यांनी दर्जेदार जैव उत्पादने तयार करण्यासाठी योग्य उत्पादन पद्धतींचा अवलंब करण्याचा प्रयत्न करून, ते इतर शेतकऱ्यांना वाजवी दरात उपलब्ध करून दिले आहे. शेतकऱ्यांमध्ये सेंद्रिय शेतीबाबतच्या वाढत्या जागरूकतेचा त्यांनी फायदा घेत, विविध प्रकारचा सेंद्रिय आणि जैविक कच्चा माल बाजारात आणला आहे आणि शेतकऱ्यांना विकला आहे. सेबॅस्टियन हे असेच एक उद्योजक शेतकरी आहे, जे सेंद्रिय कच्च्या मालाचे यशस्वीपणे, उत्पादन करून प्रदेशातील इतरांसाठी आदर्श ठरत आहे. सेबेस्टियन हे तामिळनाडूच्या त्रिची जिल्ह्यातील वायमपट्टी ब्लॉकमधील मगवानूर गावातील एक छोटे शेतकरी असून, त्यांच्या मालकीची साडेचार एकर शेतजमीन आहे, त्यातील अडीच एकर पावसावर अवलंबून आहे. ते दोन एकरावर, विहीर आणि बोअरवेलच्या स्रोताद्वारे सिंचन करतात.

एक दशकाहून अधिक काळ चक्रीय दुष्काळ असल्याने पिकांची लागवड करणे त्यांच्यासाठी नेहमीच आव्हान ठरले होते. त्यामुळे त्यांनी भातासारख्या जास्त पाणी असलेल्या पिकांची लागवड मर्यादित ठेवली आणि कडधान्य, पडवळ, लौकी यासारख्या वेलींच्या उत्पादनाकडे वळले. या वेलींच्या सावलीत त्यांनी नावीन्यपूर्ण पद्धतीने टमाटरची लागवड केली. याप्रकारची लागवड, तळागाळातील प्रभावी नवकल्पनांपैकी एक म्हणून ओळखली जाते. २०१२ मध्ये नॉर्वे आणि TNAU च्या क्लायमा - ॲडॉप्ट प्रोग्राममध्ये हे उदाहरण समाविष्ट करण्यात आले आहे.

सेंद्रिय शेतीचा प्रवास

ते राहतात आणि शेती करतात ते ठिकाण 'वनगाम'च्या अगदी जवळ आहे. तामिळनाडूतील एक प्रसिद्ध सेंद्रिय शेती समर्थक स्वर्गीय श्री. नाम्मलवार यांची ही संस्था आहे. २०१३ मध्ये, त्यांनी वनगामच्या सुरुमानपट्टी गावातील पर्यावरणपूरक शेतात पर्यावरणीय शेतीवरील ५ दिवसीय अभ्यासक्रमात भाग घेतला. शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी हा एक महत्त्वाचा टप्पा होता. AHIMS या स्थानिक स्वयंसेवी संस्थेने आयोजित केलेल्या एकात्मिक कीड व्यवस्थापनावरील प्रशिक्षणात सेबॅस्टियननेही भाग घेतला. तामिळनाडूमध्ये १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात अचए च्या तांत्रिक मार्गदर्शनाने खझच पद्धती स्वीकारणाऱ्या अग्रगण्य संस्थांपैकी ही एक आहे (कृषी मनुष्य पर्यावरणशास्त्र). आणि वायमपट्टी भागामध्ये पर्यावरणीय शेतीच्या प्रचारासाठी काम करीत आहे. नंतर ते NABARD आणि AHIMS यांनी पाठबळ दिलेल्या गहरींरी चरपवीरा चे सक्रिय सदस्य झाले. वनगाम आणि AHIMS कडून त्यांना मिळालेल्या प्रसिद्धीमुळे, सेबॅस्टियन प्रेरित आणि मजबूत झाले. सेबेस्टियन सेंद्रिय शेतीबद्दलच्या त्याच्या दृढ विश्वासाने प्रेरित आणि दृढ झाले. त्यांनी स्वत:च्या शेतात सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करण्यास सुरुवात केली आणि वर्षभरातच त्यांनी त्यांच्या साडेचार एकर क्षेत्रामध्ये सेंद्रिय पद्धतीचा अवलंब केला.

सर्जनशीलतेसाठी संकट

त्याच्या दृढ विश्वासाला आव्हान देण्यासाठी निसर्गाने आपली भूमिका बजावण्यास सुरुवात केली. सलग वर्षांच्या दुष्काळ आणि कोरड्या स्पेलच्या रूपात ज्याने सेंद्रिय शेतकरी म्हणून पुढे जाण्याचे त्यांचे स्वप्न भंगले. प्रदेशात सलग काही वर्षे कमी पाऊस पडल्यामुळे पावसावर अवलंबून असलेल्या जमिनीवर लागवड करता आली नाही. खुली विहीर तसेच बोअरवेल कोरडी पडल्याने बागायती जमिनीवर काहीही पिकवणे अशक्य झाले आहे. आपली भाजी वाचवण्यासाठी सेबॅस्टियनला भांड्यांमध्ये पाणी आणावे लागले आणि आपल्या वेलींना पाणी द्यावे लागले. याच वेळी, त्यांना तामिळनाडू कृषी विद्यापीठाने पुदुक्कोट्टई जिल्ह्यातील कुदुमियानमलाई येथील अण्णा हॉर्टिकल्चर फार्म येथे आयोजित केलेल्या दोन दिवसीय प्रशिक्षणात सहभागी होण्याची संधी मिळाली. जैविक कच्च्या मालाचे उत्पादन आणि विपणनाद्वारे शेतकरी पर्यायी उत्पन्न कसे मिळवू शकतात यावर प्रशिक्षणात लक्ष केंद्रित करण्यात आले. प्रशिक्षणातील सहभागाने आणि कल्पनांमुळे त्यांना जैविक कच्च्या मालाच्या निर्मितीमध्ये पुढाकार घेण्याचा आत्मविश्वास मिळाला. त्यांच्या शेतीच्या संकटावर उपाय म्हणून त्यांनी याकडे बघितले. अशा प्रकारे, त्यांनी आपले लक्ष आणि ऊर्जा पीक लागवडीपासून जैविक कच्च्या मालाचे उत्पादन आणि विपणनाकडे वळवली.



सेबेस्टियन येणाऱ्या पाहुण्याला सेंद्रिय खत तयार करण्याची प्रक्रिया सांगतांना





''माझ्याकडे सेंद्रिय शेती करण्यासाठी पुरेशी जमीन असली तरी, पाण्याच्या मर्यादित उपलब्धतेमुळे मी माझ्या ५०% जमिनीतच पिके घेऊ शकलो. त्याच वेळी सेंद्रिय शेतीमध्ये स्वारस्य असलेल्या काही शेतकऱ्यांनी स्वतःचे जैव निविष्ठा तयार करण्यास असमर्थता व्यक्त केली. म्हणून मी बायो-इनपुटचे उत्पादन घेण्याचे ठरवले, जे केवळ माझ्यासाठी उत्पन्नाचे साधन बनले नाही, तर सेंद्रीयकडे जाण्यास इच्छुक असलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यास मला मदत केली. हे मला आनंदी आणि समाधानी करते.'' सेबॅस्टियन म्हणतात.

जैविक कच्च्या मालाचे उत्पादन आणि उत्पन्न

सध्या, ते त्यांच्या शेतात उपलब्ध असलेल्या कच्च्या मालावर आधारित दशगव्य, पंचगव्य, फिश अमिनो ॲसिड, वर्मी कंपोस्ट, हर्बल पेस्ट रिपेलेंट मिश्रण यांसारखा जैविक कच्चा माल तयार करण्यात गुंतलेले आहेत. गुरेढोरे आणि पिकांचे अवशेष कच्चा माल म्हणून काम करतात आणि बाहेरून मर्यादित कच्चा माल मिळवितात. त्यांच्याकडे २ देशी गायी (मानापारी गायी नावाची मूळ जात) आणि १ जर्सी गाय आहे. ते केवळ जैविक कच्चा माल तयार करण्यासाठी देशी गायींचे गोमूत्र आणि शेण वापरतात. त्यांचे उद्योजकीय कौशल्य पाहून कृषी विभागाने त्यांना २ टन क्षमतेचे वर्मी कंपोस्ट खड्डे तयार करण्यास मदत केली. त्याचप्रमाणे, अक्खचडअ या स्थानिक स्वयंसेवी संस्थेने त्यांना दशगव्य, पंचगव्य, फिश अमिनो ॲसिड आणि हर्बल कीटकनाशक मिश्रण आणि फवारणीसाठी समांतर सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यांची पत्नी आणि दोन मुलांचे संपूर्ण कुटुंब या उपक्रमात सहभागी आहे. त्यांनी आपल्या मुलांना औषधी वनस्पती ओळखण्यासाठी प्रशिक्षित केले आहे आणि त्यांना आवश्यक असलेल्या औषधी वनस्पती आणि कच्चा माल गोळा करणे, जैविक कच्चा माल तयार करणे, नियमित देखरेख, देखभाल आणि विपणन देखील शिकवले आहे.

आपल्या शेतीच्या गरजा पूर्ण केल्यानंतर, सध्या सेबॅस्टियन दरवर्षी १०० लिटर दशगव्य, १०० लिटर पंचगव्य, २० लिटर फिश अमिनो ॲसिड १०० लिटर हर्बल कीटकनाशक मिश्रण बाजारात आणतात आणि २००० किलो वर्मी कंपोस्ट बायो इनपुट्सच्या विक्रीतून वार्षिक उत्पन्न सुमारे रु. ६०००० /- उतके कमवितात. त्याच्या खरेदीदार यादीत सुमारे ६०/७० शेतकरी आहेत आणि त्यापैकी २० वारंवार खरेदी करणारे आहेत. जवळपास, ९०% जैविक कच्चा माल त्यांच्या शेताच्या फाटकाटाच विकल्या जातो, उरलेला ते फोन संपर्काद्वारे विकतात. उशिरा का होईना सोशल मीडियावर बरेच शेअर केले जात आहे ज्यामुळे त्यांच्या बायो इनपुटची मागणी वाढली आहे. जैव कच्चा माल तयार करण्यात आणि वापरण्यात स्वारस्य असलेल्या शेतकऱ्यांना ते सल्ला देखील देतात.

बाजारातील आव्हाने पेलण्यासाठी जे शेतकरी सेंद्रिय लागत माल तयार करतात त्यांना किमान सुरवातीस बाय-बॅक-सपोर्टची गरज

मिनी प्रयोगशाळा

२०१८-१९ मध्ये, कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या सामूहिक उपक्रमांना बळकटी देण्यासाठी आणि त्यांची उद्योजकीय कौशल्ये वाढवण्यासाठी राज्यस्तरीय प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. सेबॅस्टियन, ऋझजचे सदस्य म्हणून, ७० शेतकऱ्यांसह प्रशिक्षणात सहभागी झाले होते. प्रशिक्षणानंतर, सेबॅस्टियनने मेटारिझियम ॲनिसोप्लिया, बुरशीजन्य एन्टोमोपॅथोजेनच्या उत्पादनात स्वारस्य व्यक्त केले जे जमिनीत राहणारे कीटक आणि संबंधित मुळांच्या सडण्याच्या समस्यांसाठी जैव नियंत्रण एजंट म्हणून कार्य करते. त्यांनी कृषी विभागाशी संपर्क साधला आणि एक मिनी लॅब उभारण्यात आणि मॅटरहिझियमचे उत्पादन करण्यात रस दाखवला.

पाठपुरावा म्हणून कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली आणि त्यांच्या गटातील सदस्यांशी संवाद साधला आणि मिनी लॅबच्या स्थापनेची योजना अंतिम केली. लॅब - टेबल प्रेशर कुकर यूव्ही दिवे बादल्या आणि कंटेनर स्थापन करण्यासाठी साहित्य खरेदी करण्यासाठी एकूण ७०,२००/- रुपयांची मदत करण्यात आली. सेबॅस्टियन दरवर्षी सुमारे ५० किलो मेटारहिझियम तयार करतात आणि सुमारे रु. ९,०००/- कमवितात. तथापि, विपणनाची आव्हाने आहेत. कृषी विभाग आकर्षक पॅकिंग आणि बँड नावासह शेतकऱ्यांना थेट मेटारहिजियमची विक्री करतो. विभाग स्वतःच सेबॅस्टियन सारख्या शेतकऱ्यांसाठी प्रतिस्पर्धी बनतो. ज्यांचे उत्पादन चांगले पॅक केलेले किंवा बॅंड केलेले नाही मार्केटिंगच्या या आव्हानांवर मात करण्यासाठी सेबेस्टियन सुरुवातीलाच बाय बॅक सपोर्ट शोधतात.

निष्कर्ष

सेबेस्टियन आणि इतर शेतकरी सेंद्रीय पद्धतीने त्यांच्या जमिनीचे आरोग्य सुधारत असल्याचे पाहून आनंदी आहेत. सेंद्रिय पद्धतीचा वापर केल्याने मातीच्या खालील जीवसृष्टी पुन्हा सजीव झाली. निरोगी झाडे, कमीत कमी रासायनिक खते आणि कुटुंबासाठी सुरक्षित आणि चवदार अन्न मिळविण्यात सुधारणा झाली आहे. सेबॅस्टियनचे अनुभव स्थानिक वृत्तपत्रांमध्ये आणि ऑल इंडिया रेडिओ तिरुचिरापल्ली येथे वेल्विन अरंगममध्ये आले आहेत, जो शेतीसाठी खास प्राइम टाइम स्लॉट आहे. सेबॅस्टियन या क्षेत्रातील उद्योजकतेसाठी एक आदर्श म्हणून उदयास आले आहेत.

Victor I, Secretary, AHIMSA,
No.1-207C, Sona Complex, Main Road, Vaiyampatti-621 315
Trichi District, Tamil Nadu
Email : info@ahimsa.ngo

Suresh Kanna K, Senior Team Member
Kudumbam, 113/118, Subramaniyapuram, Trichy 620 020
E-mail: kannasuresh71@gmail.com

मराठी अनुवाद : सोनाली अडवतकर

Source : Entrepreneurship to promote organic farming, Leisa India - March, 2021